# पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पनवेल, नवी मुंबई.

**“प्रेसनोट”** दि. २४/०३/२०२१

**“पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२ पनवेल मधील पनवेल तालुका पोलीस ठाणेकडून अट्टल वाहनचोरास अटक ”**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात वाहनचोरीचे घटना घडत असल्याने, अशा प्रकारचे गुन्हे करणारे आरोपींबाबत माहीती मिळवुन जास्तीत जास्त वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आण्याचे दृष्टीकोनातून प्रयत्न करणेबाबत मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई श्री बिपिन कुमार सिंह, मा. पोलीस सह आयुक्त डॉ. जय जाधव, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पनवेल श्री शिवराज पाटील, मा. सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, श्री नितीन भोसले–पाटील, यांनी आदेश देवुन तपासाबाबत महत्वपुर्ण सुचना दिलेले होत्या. वरीष्ठांनी दिलेले सुचनांप्रमाणे पनवेल तालुका पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री रविंद्र दौंडकर यांनी गुन्हे प्रकटिकरण पथकाचे सपोनि विजय खेडकर व पथकातील अंमलदार यांना मार्गदर्शन केले होते.

त्यानुसार पनवेल तालुका पोलीस स्टेशनकडे दाखल असलेला वाहन चोरीचा गुरनं ५९/२०२१ भादवि कलम ३७९ या गुन्हयाचा तपास करीत असताना सपोनि विजय खेडकर यांना त्यांचे एका गुप्त बातमीदाराकडून मिळालेले बातमीवरून आरोपी नामे ’’’’’’’’’’’’’’’’’, वय–३७ वर्षे, सध्या रा. मु. वाकळण, पो. उसाटणे, ता. अंबरनाथ, जि. ठाणे यास दिनांक २०/०३/२०२१ रोजी वाकळण गावातून ताब्यात घेवुन त्याचेकडे सखोल चौकशी केली असता त्याने सदर गुन्हयाची कबुली दिल्याने त्यास दिनांक २०/०३/२०२१ रोजी पनवेल तालुका पोलीस ठाणे गुरनं ५९/२०२१ भादवि कलम ३७९ या गुन्हयात अटक करण्यात आली. पोलीस कोठडी रिमांड मुदतीत त्याचेकडे केलेल्या कसुन तपासामध्ये त्याने तळोजा पोलीस ठाणे हद्दीतून एक ऑटोरिक्षा व पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतून एक मोटारसायकल चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानुसार आरोपीकडून सदर गुन्हयातील ऑटोरिक्षा क्रमांक एमएच ४६ एझेड ८३६० सह तळोजा पोलीस ठाणे गुरनं १९/२०२१ भादवि कलम ३७९ मधील ऑटोरिक्षा क्रमांक एमएच ४६ बीडी ४६३० व पनवेल तालुका पोलीस स्टेशनकडील गुरनं ६५/२०२१ भादवि कलम ३७९ या गुन्हयातील ॲक्टीव्हा ५ जी क्रमांक एमएच ४६ बीएस ४७१४ असे एकूण दोन ऑटो रिक्षा व एक ॲक्टीव्हा ५ जी अशी ०२,१०,०००/– रू. किंमतीची एकूण ३ वाहने हस्तगत करण्यात यश प्राप्त केले आहे.

सदरची यशस्वी कामगिरी करण्यामध्ये वरीष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांचेसह पोनिरी(गुन्हे) अंकुश खेडकर, सपोनि विजय खेडकर, पोउपनिरी आकाश पवार, पोहवा/अमोल कांबळे, पोहवा/अमृत शिंदे, पोहवा/संतोष शिंदे, पोना/राकेश मोकल, पोना/सागर रसाळ, पोकॉ/राजकुमार सोनकांबळे व पोकॉ/सुनिल खैरणार यांनी महत्वपुर्ण भुमिका बजावली आहे.

---

**अटक आरोपींकडून आतापावेतो उघडकीस आलेले वाहनचोरीचे गुन्हे**

१) पनवेल तालुका पोलीस ठाणे गुरनं ५९/२०२१ भादवि कलम ३७९
२) पनवेल तालुका पोलीस ठाणे गुरनं ६५/२०२१ भादवि कलम ३७९
३) तळोजा पोलीस ठाणे मुंबई गुरनं १९/२०२१ भादवि कलम ३७९

---

––––––००००००––––––